राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१७
दि. १६ सप्टेंबर, २०१७ 2017

# XO9

## भाषा पेपर क्र.-1 / Language Paper - 1

605076

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा**
**Standard : H.S.C.**

**एकूण गुण : 100**
**Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक**
**Nature of Paper : Conventional type**

**कालावधी : 3 तास**
**Time allowed : 3 hours**

***सूचना/ Note :***

(i) *उमेदवाराने **भाग** - 1 मराठी व **भाग**- 2 इंग्रजीकरिता **स्वतंत्र उत्तरपुस्तिका** वापरावी.*
*Candidates should use **two separate answerbooks for Part** - 1 Marathi and **Part**-2 English.*

(ii) ***सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*
*All questions are **compulsory**.*

(iii) *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

(iv) *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

(v) *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.*

(vi) *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/ उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If part of answer or subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

(vii) *उमेदवाराने **भाग** - 1 मराठी या उत्तरपुस्तिकेत **भाग** - 2 इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच **भाग** - 2 चे उत्तरपत्रिकेत **भाग** - 1 (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer **Part-1** Marathi Question in **Part-2** English answerbook and vice-versa, otherwise it will be overlooked.*

SEAL

**P.T.O.**

## भाग-1 मराठी ( अनिवार्य ) 50

**1. निबंध लेखन** **25**

पुढीलपैकी एका विषयावर (सुमारे **400 शब्द** मर्यादा) एक निबंध लिहावा.

(a) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ प्रेम

(b) राष्ट्रपतीपदाची निवडणूक आणि जातीय समीकरण

**2.** भाषांतर (250-300) **15**

(इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा)

**ANNA BHAU SATHE** (1920-1969), a man without any formal education becoming an eminent writer is one of the wonders in the history of Marathi literature. Acknowledged by common consent as the first noteworthy and capable *dalit* writer, he has proved to be a kind of guiding light for the posterity of *dalit* writers and could also be treated as the first prominent chronicler of Maharashtra's pre-Independence and some part of post-Independence rural life and culture with its first-hand knowledge and deep understanding.

By writing quite authentically, ably and with liveliness almost for the first time about the hitherto neglected, unheeded sections of society like nomads, the exploited etc., he opened up a mine of strikingly new themes and subjects. It was only he who converted the most popular folk theatre of Maharashtra namely *tamasha* into *loknatya* that gained prestige, seriousness and social recognition.

Having himself come from grass-root level and having lived at the same level throughout his life, he never became an ivory-tower writer. Himself being a proletariat, he was not only a poet, a short story writer and a novelist, but was also a very committed activist of Communist Party. Since he kept himself away from blind imitation of communism, his literature appeals even to those who are not communists.

**Bajrang Sukhdeorao Korde** (b. 1956), the author, Ph.D. in English from Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad (M.S.) is currently Professor and Head of the Department of English, University of Pune (Maharashtra)

3. खाली दिलेल्या उताऱ्याचे 1/3 शब्दात सारांश लेखन करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 10

युगायुगाच्या वाटचालीत मानवाने नाना धर्मपंथ जन्माला घातले. अनेक रूढी-परंपरांना जन्म दिला. कधी काळी व्यवसायाच्या वाटणीमुळे निर्माण झालेल्या जाती, धर्माने सांगितलेल्या वर्णजाती, तर कधी प्रत्यक्ष वर्णावरून पडलेले वांशिक भेद हे सगळं घेऊन आज आपण आधुनिक युगातून वाटचाल करतो आहोत. इतिहासाच्या या प्रदीर्घ वाटचालीत माणसाच्या मनात काही वृत्ती-प्रवृत्तींचा उगम झाला आहे. प्राण्यांसारख्या नैसर्गिक वृत्ती-प्रवृत्ती तर माणसाच्या ठिकाणी होत्याच होत्या; त्यात सामाजिक वृत्ती-प्रवृत्तींची अधिकची भर पडली. या सामाजिक वृत्ती-प्रवृत्ती मानवी मनाशी व जीवनाशी इतक्या एकरूप झाल्या, की पुढे त्याही माणसाला नैसर्गिकच वाटू लागल्या. यातून मग धार्मिक, वांशिक, जातीय हे कप्पे अधिकाधिक पक्के होत गेले. आपला वंश, धर्म, जात, श्रेष्ठ; बाकीचे सगळे कनिष्ठ ह्या स्वकेंद्री वृत्तीतून ज्याच्या हाती उत्पादन साधनांची मालकी आली त्या वर्गाने स्वत:च्या फायद्याची सामाजिक रचना उभारण्याचा प्रयत्न केला. हा फायदा त्रिकालाबाधित कसा टिकून राहील यासाठीही त्याने अनेक सामाजिक उपरचना अस्तित्वात आणल्या. हे सगळं करत असताना आपण कुणाचे हक्क हिरावून घेत आहोत, कुणाचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहोत, कुणावर अन्याय करत आहोत, याचं कसलंही भान व भय या सत्ताधारी वर्गानं बाळगलं नाही. परिणामी समाजाची शोषक व शोषित अशा दोन गटात विभागणी झाली. शोषणाच्या चिरकालीन आसक्तीनं शोषणाच्या प्रक्रियेला अनेकविध आयाम दिले; त्यातून मग अन्याय-अत्याचाराचे सत्रच सुरू झाले. जगाच्या बहुतांश सगळ्याच भूभागांवर कमी अधिक फरकाने ह्या सामाजिक अभिक्रिया घडलेल्या आहेत.

## Part-2 English (Compulsory) 50

1. Write an essay on one topic of about **400** words. 25

   (a) The fight against Terrorism - The need of the hour.

   (b) The Age of Advertisements.

2. Translation of a Marathi passage into English. 15

या ऐतिहासिक क्षणी, मी येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांचे आभार मानण्याकरिता उभा आहे. शाश्वत टिकून राहणाऱ्या महाराष्ट्र राज्याला आशीर्वाद देण्याकरिता भारताचे सध्याचे युगप्रवर्तक येथे आले आहेत. त्यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल हजारो सर्वसामान्य माणसांच्या वतीने मी माझी कृतज्ञतेची गाढ भावना व्यक्त करीत आहे. आम्ही महाराष्ट्रीय लोकं त्यांच्यावर खूप प्रेम करतो. त्यांना पूज्य मानतो आणि पुन्हा एकदा जाहीर करतो की, नवनिर्मित महाराष्ट्र राज्य महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांच्या कल्याणाकरिता सतत कार्यरत राहील. परंतु जेव्हा समर्पणाची वेळ येईल, तेव्हा आमच्याकडे जे काही सर्वोत्कृष्ट आणि भव्योदात्त आहे, ते ते भारताकरिता प्राधान्याने केले जाईल. त्याचे कारण असे की, आमचा पहिल्यापासून विश्वास आहे कि, महाराष्ट्र भारतावर अवलंबून आहे. सर्व महाराष्ट्रीय जनतेचा विश्वास आहे की, भारताची व महाराष्ट्राची दोन्हीचीही प्रगती त्याच वेळी होईल जेव्हा त्यांच्या हितसंबंधात एकरूपता असेल आणि म्हणून मी काही विशिष्ट प्रतीकांचे महत्व तुमच्या निदर्शनास आणून स्पष्ट करतो. उदाहरणार्थ, हिमालय भारताचे प्रतीक आहे आणि सह्याद्री महाराष्ट्राचे प्रतीक आहे. उत्तुंग पर्वतरांगा असलेला हिमाच्छादित हिमालय भारताचे प्रतीक आहे आणि काळ्याकुट्ट खडकांची भूमी अन् 200-300 इंच पर्जन्यवृष्टि असलेला सह्याद्री महाराष्ट्राचे प्रतीक आहे. मी तुम्हाला आश्वासन देतो की, हिमालय संकटात असेल, तेव्हा महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या संरक्षणाकरिता त्याचे खडकाळ सामर्थ्य उभे राहील.

'कठोर परिश्रम' हे आपल्या काळातील ब्रीदवाक्य आहे आणि पंडितजी, आपण आम्हांला महाराष्ट्राची आणि भारताची उभारणी परिश्रमाने करण्याचा संदेश दिला आहे. आम्ही हा मौल्यवान संदेश आमच्या अंत:करणात कोरुन ठेवू आणि एका युगप्रवर्तकाचे आशीर्वाद व मार्गदर्शन म्हणून तुमच्या आशीर्वादाकडे आणि तुमच्या मार्गदर्शनाकडे लक्ष पुरवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करु.

3. Precis of the passage in about **1/3** of its original length with a suitable title : **10**

There is an enemy beneath our feet-an enemy more deadly for his complete impartiality. He recognises no national boundaries, no political parties. Everyone in the world is threatened by him. The enemy is the earth itself. When an earthquake strikes, the world trembles. The power of a quake is greater than anything man himself can produce. An Earthquake strikes without a warning and the damage it cause is very great. Gas mains burst explosions are caused and fires are started. Underground railways are burst open Buildings collapse, bridges fall and dams burst. If the quake strikes at sea, huge tidal waves sweep inland. If it strikes in mountain ranges, avalanches roar down into the valley. Considering the terrifying statistics from the past 1755 : Lisbon, Capital of Portugal - the city destroyed entirely and 450 killed. 1970 : Peru : 50,000 killed. In 1968 an earthquake struck Alaska. As this is a relatively unpopulated part, only a few people were killed. But it is likely that this was one of the most powerful quakes ever to have hit the world. Scientists are facing problems. They are dealing with forces so immense that man cannot hope to resist them. Precautionary measures can be taken to saves lives.

- o O o -

SEAL